# लोकशिक्षक संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनातील संवादकौशल्य : एक अभ्यास

**प्रा. डॉ. नरेंद्र पाखरे**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग
स्व. छगनलाल मुलजीभाई कढी कला
महाविद्यालय, अचलपूर कॅम्प, जि. अमरावती

**प्रस्तावना :**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये कीर्तनाला असाधारण महत्त्व आहे. प्रभावी संवाद माध्यम म्हणून पारंपारिक लोकमाध्यमाचा वापर करण्याची परंपरा भारत देशात फार प्राचीन काळापासून सुरू आहे. लोकरंगभूमीवरील पारंपारिक लोकमाध्यमे समाज प्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम म्हणून फार संवेदनशील असतात. त्यामुळे आजही याद्वारे मौखिक परंपरेतून जनसंवादाचे एक प्रभावी माध्यम म्हणून महत्त्वाचे आहे. समाजात परंपरेने चालत आलेल्या दृष्ट रूढी आणि परंपरा यासंबंधी जाणीव जागृती करण्यासाठी तसेच समाजप्रबोधनाचा एक नवा मंत्र या माध्यमातून दिला जातो. नैतिक मूल्यांचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी जनसंवादाचे अनेक माध्यमे आहे. त्यापैकी कीर्तन हे सर्वात प्रभावी असे माध्यम आहे. कीर्तनामध्ये गायन, वादन, वक्तृत्त्व, अभिनय, विनोद, गांभीर्य आणि श्रोतुसंवाद या विशेषांचा अप्रतिम संयोग आढळून येतो. भारतातील कीर्तनरूपी परंपरेने आपल्या संस्कृतीचे रक्षण केले. डॉ. प्रभाकर मांडे यांचे मत लक्षात घेतल्यास त्यांच्या मते, "धर्मोपदेशाचे आणि सत्प्रचाराचचे प्रभावी माध्यम म्हणून महाराष्ट्रातील संतमहंतानी या संस्थेचा अत्यंत यशस्वीपणे वापर केला. केवळ धर्मोपदेशाचे साधन म्हणून नव्हे तर राष्ट्रीय भावनेच्या जागृतीसाठी देखील कीर्तनाचा उपयोग भारतातील कीर्तनकारांनी केला. नवविध भक्तीत विशुद्ध भक्तीचे साधन म्हणून कीर्तनाचा महिमा व प्राचीन काळापासून वर्णन करण्यात आलेला आहे. परमेश्वर प्राप्तीचा एक अत्युत्तम मार्ग या दृष्टीनेही कीर्तनाचे महत्त्व महाराष्ट्रातील संतांनी ओळखले होते."

महाराष्ट्रात कीर्तन या सांस्कृतिक संस्थेचे विशिष्ट स्वरूप विकसित झालेले आहे. भारतातील विविध राज्यात कीर्तनाचे वेगवेगळे अर्थ आणि प्रकार दिसून येतात. एक भक्तीप्रकार म्हणून कीर्तन परंपरेला वैदिक काळापासून महान परंपरा लाभलेली आहे. त्यामधून भक्तीतत्वाचा आनंद मिळत असतो. नवविधा भक्तीतील जे नऊ भेद आहेत, त्यापैकी कीर्तन संस्थेचा दुसरा क्रमांक येतो. श्रीमद भागवतात असे म्हटले आहे की,

*श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम्*
*अर्चनं वन्दनं दास्यं सरन्यमात्मनिवेदनम्॥*

नवविधा भक्तीप्रकारांपैकी पहिले तीन प्रकार परमेश्वराविषयी श्रद्धा निर्माण करण्यास उपयुक्त ठरतात. कीर्तनात नृत्य, गीत, वाद्य यांच्या साहय्याने वातावरण निर्मिती करून परमेश्वराचे गुणवर्णन करून त्याची महती सांगून, त्यासंबंधी आसक्ती निर्माण केली जाते.

आज महाराष्ट्रात नारदीय कीर्तन व वारकरी कीर्तन अशा दोन कीर्तन परंपरा दिसून येतात. नारदीय कीर्तन परंपरा ही नारदापासून सूरू झाली. नारदीय कीर्तन परंपरेत वक्तृत्व, नाट्य, संगीत यांचा संयोग दिसून येतो. कीर्तनामध्ये श्रोत्यांना महत्त्वाचे स्थान असते. कीर्तनकार हा कीर्तन आणि श्रोते यांच्यातील सिद्ध होणारा नाट्यमय प्रयोग आहे. त्यातील नाट्यनिरूपण आणि गायन यांच्या संयोगामुळे कीर्तन हे नाट्यप्रयोगाचे एक विश्व निर्माण होते. कीर्तनकाराचे वक्तृत्व हे त्याच्या कथानिवेदनातून नाट्यमयरित्या दिसून येते. आपल्या निवेदनातून आणि संवादातून लयबद्ध भाषेत श्लोक, अभंग, कटाव, छंद या सर्वांचा अतिशय चपलखपणे वापर करत असतो. कीर्तन प्रयोगात मृदंग, टाळ याबरोबर हार्मोनियमाला महत्त्व असते. कीर्तन हे केवळ निरूपनप्रधान नसते तर त्यामध्ये नृत्य , संगीत, निवेदन, संवाद या सर्वांच्या संयोगातून एकपात्री नाट्यदर्शन त्यामधून होत असते. कीर्तनाच्या रंगभूमीवर एक भूमिका स्वीकारून कीर्तनकार नाट्यपूर्ण प्रयोग सादर करीत असतात. महाराष्ट्रात लोकशिक्षणाच्या उद्देशाने कीर्तन केले जाते. संत गाडगेबाबांनी

पारंपारिक कीर्तनसंस्थेला फाटा देऊन आपली स्वत:ची कीर्तन परंपरा सुरू केली. लोकभाषेतून लोकांना कळेल अशी भाषाशैली आणि संवादशैली वापरून त्यांनी जनजागृतीचे कार्य केले. आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून लोकशिक्षणाचे व लोकसुधारणेचे महान कार्य त्यांनी केले.

लोकशिक्षक संत गाडगे बाबा यांच्या कीर्तनशैलीचे स्वरूप हे प्रचलित परंपरेपेक्षा भिन्न आहे. गाडगेबाबांनी स्वत:ची कीर्तनशैली निर्माण करून तिचा यशस्वीपणे वापर केला आहे. त्यांनी कीर्तनासंबंधीचे सर्व प्रचलित संकेत मोडून काढले. कीर्तनाची बैठक कशी असावी, श्रोत्यांनी कुठे बसावे, वाद्ये कोणती असावीत, ती कशी वाजवावीत यासंबंधीचे नियम त्यांनी धाब्यावर बसविले. कीर्तनाचा प्रारंभ कसा व्हावा व त्याची सांगता कशी व्हावी या नियमांकडे दुर्लक्ष करून कीर्तनाच्या आशयाला महत्त्व दिले. हा आशय सामान्यजनांच्या, प्रेक्षक मायबापांच्या गळी कसा उतरवता येईल याद्दष्टीने प्रयत्न केला. प्रेक्षक मायबापांशी थेट संवाद साधला आणि त्यांच्याकडून आपल्याला हवी असलेली उत्तरे वदवून घेतली. श्रोतृसंवाद हे गाडगेबाबांच्या कीर्तनशैलीचे महत्वाचे वैशिष्ट्य आहे. त्यांनी गायनाला मुळीच महत्त्व दिले नाही. त्यापेक्षा त्यांनी आपल्याला हवी असलेली उत्तरे लयीतच वदवून घेण्यावर जास्त भर दिला.

*'धोंड्यात देव असतो का ?'*
*'ना SS S ही SSSSSSS'*
*'धातूत देव असतो का ?'*
*'ना SS S ही SSSSSS'*
*'देव कुठे असतो ?'*
*'माणसा SS S त'*

कीर्तनामध्ये कीर्तनकार व प्रेक्षक हे एकाच मनोवृत्तीचे असतात. त्यामुळे त्यांच्यात एक अनुबंध निर्माण होतो. म्हणूनच कीर्तनाच्या माध्यमातून दिलेला संदेश सरळ श्रोत्यांच्या अंत:करणाचा ठाव घेते, कीर्तनाचे हे स्वरूप लक्षात घेऊनच संत गाडगेबाबांनी सामाजिक प्रबोधनाचे आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्यांचे उपयोजन केले. अर्थात त्यांच्या कीर्तनातील विषय हे सुद्धा समाजातील अंधश्रद्धा, लोकशिक्षण, सामाजिक समता अशा स्वरूपाचे असून परिवर्तनवादी होते.

संत गाडगेबाबांनी अंधश्रद्धा निर्मूलन, सावकारांच्या शोषनाचे स्वरूप उघड करणे, दारूबंदी, व्यसनमुक्ती इत्यादी विषय आपल्या कीर्तनाचे बनविले. आपल्या स्वतंत्र व अभिनव कीर्तनशैलीने त्यांनी सामान्यजनांच्या मनाचा ठाव घेतला व त्यांच्यापर्यंत समाजसुधारणाविषयक विचार पोहचविण्याचा यशस्वी प्रयत्न केला.

प्रभावी संवाद माध्यम म्हणून पारंपारिक लोकमाध्यमाचा वापर करण्याची परंपरा भारतात फार प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. पारंपारिक लोकमाध्यमे ही अधिक समाज संवेदनशील असतात. हे त्यामागील एक महत्त्वाचे कारण आहे. लोकरंगभूमीवरील संवाद माध्यमाचे प्रचाराचे साधन म्हणून संत गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनाला लोकसंवादाचे मुख्य साधन बनविले. आजही त्याद्वारे आधुनिक जीवनमूल्ये समाजात रूजविण्याचे काम ही पारंपारकि जीवनमूल्ये करीत आहेत. संत गाडगेबाबांच्या कीर्तनशैलीतील व्याख्याने ही संवाद माध्यम म्हणून येतात. या व्याख्यात्यांचे व्यासपीठ हा जणू रंगमंच असतो. कोणत्याही आहार्य अभिनयाचा वापर न करता कथन, निवेदन, प्रतिपादन मधून मधून संवादाचा वापर याद्वारे संत गाडगेबाबा प्रत्यक्ष प्रसंग उभा करीत. त्यामुळे प्रसंगाचे नाट्य हे श्रोत्यांच्या अनुभवाचा आपोआप विषय बनत असे. तो एकपात्र नाट्यप्रयोगच होत असे.

संत गाडगेबाबा आपल्या कीर्तनातून कर्मकांड, देववाद, देवाला नवस बोलणे असे भोळसट आणि दृष्ट प्रवृत्ती विषयी पटवून सांगत. कर्मकांडात्मक धर्माला त्यांनी कडाडून विरोध केला. समाजरचनेतील उतरंडीत पिचलेल्या दलित शोषितांच्या दु:खाला त्यांनी परखडपणे उत्तर देऊन त्यांच्यासाठी मार्ग मोकळे करून दिले. संत गाडगेबाबा पराकोटीचे निस्वार्थी होते. ते निर्मोही होते. कीर्तन हे संत गाडगेबाबांच्या अभिव्यक्तीचे केवळ एक माध्यम नसून त्यांच्या कार्यासाठी प्रेरक आणि प्रभावी ठरणारे अस्त्र होते. कीर्तनाचा कला म्हणून तर वापर त्यांनी केलाच परंतु एक शास्त्र म्हणूनही संत गाडगेबाबांच्या कीर्तनाचा उल्लेख केल्यास अतिशयोक्ती होणार नाही.

संत गाडगे बाबांचे कीर्तन हे पारंपारिक संत किंवा वारकरी कीर्तनकारापेक्षा वेगळे होते. नाट्यशास्त्राच्या आधारे सांगावयाचे झाले तर तो एक 'एकपात्री' प्रयोग होता. बहुजनांच्या कल्याणासाठी गाडगेबाबांनी स्वत:च विकसित केलेली 'कीर्तन' ही एक स्वतंत्र कला होती. आशय, विषय, शैली, तंत्र, भाषा आणि सादरीकरण या सर्वांचे मिश्रण त्यांच्या

कीर्तनात होते. समाजविघातक रोगांवर गुणकारक ठरणारी ती एक औषध होती. त्यांच्या कीर्तनात कला निवेदनाची कलाकारी नव्हती, मधाळ शब्दांची पखरण नव्हती तर प्रत्येकाच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारी जादू होती. आयुष्यभर कीर्तनाच्या माध्यमातून समोजोद्धारासाठी गाडगेबाबा कीर्तन करीत राहीले. त्यांनी शेकडो कीर्तने केली, पण प्रत्येक कीर्तन वेगळे असायचे. त्यांच्या कीर्तनाची कधीही पुनरावृत्ती झाली नाही. संत गाडगेबाबांनी आजन्म कीर्तनाची साथ सोडली नाही. प्रकृती ठिक नसतांनाही मुंबई येथील बांद्रा स्टेशनवर १९५६ साली अखेरचे कीर्तन केले. मानवी मूल्ये, विज्ञाननिष्ठ विचार, विवेकवादी विचारसरणी, सामाजिक सुधारणा, धार्मिक, नैतिक व आर्थिक उन्नयन, जातिभेद निर्मूलन अशा कितीतरी समस्या संदर्भात संत गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनामधून समाजाला दिशा दाखविली.

संत गाडगेबाबांच्या कीर्तनाचा अंतिम उद्देश हा लोकांशी संवाद साधून रूढी, परंपरा, व्यसने, अंधश्रद्धा, देवभोळेपणा, अस्पृश्यता, जातिभेद यांतून बाहेर काढून समाजाचे कल्याण साधणे हा होता. त्याद्दष्टीने ते लोकांसोबत संवाद साधत असत. हा खरा तर 'लोकसंवाद' होता. ते खऱ्या अर्थाने संवादक होते. प्रबोधनकार ठाकरे म्हणतात की, "तिनही लोकी श्रेष्ठ असलेल्या ब्राम्हण कथापुराणकारांनी असल्या भल्याभल्या प्रचार कथा पुराणातुन पसरविल्या. अनाडी लोकांना जाखाई-जोखाई, मरीआई, म्हसोबा, खंडोबा, बहिरोबा वगैरे शेकडो गावठी देवांची पैदास करून त्यांना कोंबड्या-बकऱ्यांचे बळी देऊन संतुष्ट करण्याचा सपाटा खेडोपाडी धुमधडाक्याने चालविला. शिव, शिवार, ओसाड जागेत एकेक गावदेव ठाण मांडून लोक पुनवेला कोंबडी बकरे कापून दारूचे नैवेद्य गरकू लागले. माणसांच्या अंगातही हे देव घुमू लागले. असल्या घुम्यांचा एक पंथच निर्माण झाला. घरात आजारपण येवो अथवा गावात पटकीचा आजार फैलो, औषोधोपचाराऐवजी गावकऱ्यांची भिस्त देवावर - घुम्या भक्तांवर. भटा भिक्षुकांप्रमाणे घुम्या भगत सांगेल ती पूर्व दिशा. त्याचा आदेश झाला की धडाधडा कोंबड्या बकऱ्यांच्या कंदुऱ्या आणि दारूचे पाट अशा देवांपुढे सुरू व्हायचे." अशा परिसिथतीत संत गाडगेबाबांनी लोकशिक्षकाची भूमिका बजावली. खडू-फळा न वापरता आपल्या कीर्तनशैलीतून आपले विचार सामान्य माणसांपर्यंत पोहचविले. त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून जो जनसंवाद साधला त्याला जगात तोड नाही. सामान्यपणे कीर्तन हे देवळात व्हायचे पण गाडगेबाबांनी कीर्तनाला देवळाबाहेर काढले आणि जनता दरबारी आणले. अधिकाधिक श्रोत्यांशी मानसिक नाते बनवून योग्य संवाद पद्धती शोधून काढली. हजारो लाखो लोकांशी थेट संवाद साधला म्हणून एक उत्कृष्ठ संवादक म्हणून त्यांचे हे कार्य ऐतिहासिक आहे. त्यांचे 'अखेरचे कीर्तन' हे त्यांच्या उत्कृष्ठ जनसंवादाचे उदाहरण आहे. आचार्य अत्रे हे गाडगेबाबांच्या कीर्तनाविषयी म्हणतात की, "बाबांचे कीर्तन श्रवण हा एक महान अनुभव आहे. तो ज्याने घेतला नसेल तो करंटा, तो दुदैवी, तो अभागी ! आमच्या आयुष्यात बाबांचे कीर्तन आम्ही परवा ऐकले. आमची पंचावन्न वर्षे फुकट गेली होती. त्या रात्री सार्थकी लागली आणि जीवन कृतार्थ झाले." याचाच अर्थ असा की संत गाडगेबाबा हे उत्तम संवादक होते. म्हणूनच त्यांनी लोकांच्या ह्दयावर राज्य केले.

जनसामान्यांच्या समस्या ओळखून त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून लोकांना दाखविला. कीर्तन करण्याचे त्यांचे एक वेगळे तंत्र होते. त्यांचे कीर्तन म्हणजे जणू प्रश्नोत्तराचा तासच. सगळा जमाव त्यात रस घेत असे. जमावाचे मानसशास्त्र लक्षात घेऊन ते आपला मुद्दा पटवून देत असत. कोणत्याही पारंपारिक कीर्तन परंपरेला जवळ न करता त्यांनी स्वतंत्रपणे आपले वेगळे स्वयंभू कीर्तनतंत्र विकसित केले. सहजस्फूर्त कीर्तन म्हणजे गाडगेबाबांचे एक प्रचारतंत्र होते. म्हणून त्याकाळातील सारे समाजजीवन ढवळून निघाले. त्यांची कीर्तनशैली ही ना हरदासी होती ना रामदासी, पारंपारिक धागा तिने कधीचा तोडून टाकला होता. देवाधर्माचे अवास्तव स्तोम त्यांनी आपल्या कीर्तनातून कधीच मांडले नाही. त्यांची कीर्तनशैली ही बंडखारे लोकाभिमुख लोकशिक्षणशैली, लोकसंवादी अशी होती. लोकभाषेतून त्यांनी आपल्या कीर्तनाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. लोकभाषेलाच आपली कीर्तनभाषा बनविली. प्रत्येकाला अंर्तमूख करणारी लोकभाषा मुद्दामपणे वापरली. मराठी भाषेला संस्कृतप्रचुर बनवून आपले अफाट पांडित्य कीर्तनात दाखविले नाही, तर खेड्यापाड्यातील दैनंदिन व्यवहारातील भाषा आपले कीर्तनाचे माध्यम म्हणून स्वीकारले. खास वऱ्हाडी शैलीतील त्यांचे कीर्तन म्हणजे साधे, सरळ, सुबोध आणि रसाळ असा निर्मळ भाषाप्रवाह होता. एकूणच लोकभाषेचा वापर अध्यात्म, आरती, विधी यांना दिलेला फाटा, सवाल-जबाबाची

'फीडबॅक पद्धती', मनोरंजक पण प्रभावी निर्देश साभिनय लोकशैलीत केलेला भाषेचा वापर अशी आगळी-वेगळी लोकसंवादी कीर्तनशैली त्यांनी स्वीकारली. जनसंवाद म्हणून गाडगेबाबांनी या शैलीला जन्मास घातले. म्हणूनच ते खऱ्या अर्थाने लोककल्याणाचे 'जनसंवादक' ठरतात.

लोक संत गाडगेबाबांना 'संत' म्हणत. पण ते खऱ्या अर्थाने लोकशिक्षक होते. 'शिक्षणाशिवाय माणूस आंधळा आहे', असे ते म्हणत. संत गाडगेबाबांचा जनसंपर्क अतिशय दांडगा होता. त्यामुळेच त्यांच्या कीर्तनातील विषय हे तर्कशुद्ध, बुद्धीनिष्ठ होते. त्यांच्या कीर्तनाचे सर्व विषय हे जनतेच्या भावनेशीच प्रामुख्याने संबंधित असल्याने जनसंवाद प्रक्रिया यशस्वी आणि प्रभावी होण्यास सहाय्यभूत ठरली. संत गाडगेबाबांनी कीर्तनाचा सर्व आकृतीबंध बदलला. आपला बुद्धीवादी आणि परिवर्तनवादी विचार साध्या-सोप्या वऱ्हाडी बोलीच्या माध्यमातून समाजातील सर्वसामान्यांच्या गळी परिणामकारकरित्या उतरविले आणि हे करण्यासाठी त्यांनी कीर्तनरूपी संवादमाध्यमाचा आधार घेतला, जो अत्यंत प्रभावी व परिणामकारक ठरला. 'लोकशिक्षणातून सुमाजसुधारणा' करण्यासाठी त्यांनी कीर्तनाचा प्रभावी वापर केला. त्यांचे कीर्तन नेहमीच नाट्यपूर्ण, संवादात्मक आणि हृदयस्पर्शी ठरत असे. जनसामान्यांच्या कळवळ्याने ओतप्रोत भरलेले असे. भूतदया हीच परमेश्वराची पूजा आहे, अशी समाजवादी विचारसरणी त्यांनी मांडली. ते बोलघेवडे समाजसुधारक नव्हते तर आचार्य अत्रे यांनी म्हटल्याप्रमाणे "गाडगेबाबा हे महाराष्ट्रातले समाजवादाचे एक चालते-बोलते व्यासपीठ होते", हे त्यांच्या जनसंवादी कीर्तनातून दिसून येते. संत गाडगेबाबांच्या चरित्राचे लेखक सुदामजी सावरकर 'तपोमूनी गाडगेबाबा' यांच्याबाबत लिहितात की, "बाबांच्या विचारात 'सत्य' रूजविण्याचे, जीवनाला 'शिव' मंगल बनविण्याचे नि सर्वत्र 'सुंदरता' फुलविण्याचे तेज आहे." आचार्य अत्रे पुढे म्हणतात की, "साहित्याचा व वक्तृत्वाचा अभ्यास न करताही मराठी भाषा त्यांच्या जवळ पाणी भरत. ते बोलतात की, जन्मभर साहित्याशी कुस्त्या खेळत बसलेले आमच्यासारखे भाषाप्रभू त्यांच्याकडे तोंड वासून पाहत असतात. यावरून संत गाडगेबाबा हे भाषाप्रभू होते. भाषेवर त्यांची फार मोठी हुकमत होती. वऱ्हाडी भाषेला त्यांनी ज्ञानभाषेची प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. कीर्तनशास्त्राचे कोणतेही शास्त्रशुद्ध शिक्षण न घेता त्यांनी प्रभावी आणि परिणामकारक कीर्तनं केली. कीर्तनशास्त्रालाही नवी कीर्तनशैली दिली. कीर्तनात ते विनोद करीत, जनसमूहाला खळवळून हसवित, त्यांचे कीर्तन हे गंभीर तसेच गमतीदारही असे. करूण, हास्य आणि भक्ती अशा विविध रसांची निर्मिती ते आपल्या वऱ्हाडी बोलीतून करीत असत. त्यांच्या अखेरच्या कीर्तनतून त्यांच्या ढंगदार वऱ्हाडी बोलीचा अस्सल प्रत्यय येतो.

भक्तविषयक विचार करणारा महाराष्ट्रातील एकमेव संत म्हणून संत गाडगेबाबांचा उल्लेख केला जातो. त्यांचा खरा पिंड फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीला अधिक जवळचा वाटतो. शब्दबंबाळ सामाजिक विचारांनी जे साधले गेले नाही हे संत गाडगेबाबांनी लोकभाषेतून मोठ्या प्रमाणात साधले. 'बुडते हे जन न देखवे डोळा' या संत वचनाप्रमाणे बाबांनी जातीभेद, अंधश्रद्धा, सावकारीपाश, कर्मकांड अज्ञान आणि व्यसनाधिनता यापासून लोकांना मुक्त करण्यासाठी खास वऱ्हाडी शैलीने साभिनयासहित सत्य पटवून देऊन लोकांच्या डोळ्यात अंजन घातले. चांगला शिक्षक जसा विद्यार्थ्यांकडून सत्य वदवून घेतो तसे त्यांनी श्रोत्यांकडून सत्य वदवून घेतले.

लोकभाषेतून श्रोतृसंवाद चाललेला हा कीर्तन सोहळा म्हणजे उघड्या माळावरची चालती-बोलती पाठशाळाच होती. संत गाडगेबाबांचे कीर्तन हे अनौपचारिक शिक्षणाचे माध्यम होते. त्यांच्या कीर्तनात येणारे विषय हे त्यांनी केलेले तर्कशुद्ध आणि बुद्धीनिष्ठ विवेचन त्यांच्या जनसंपर्कातून आले असल्याने त्यांचे कीर्तन हे महाकीर्तन होत असे. कीर्तनकार अनेक झालेत, होतीलही परंतु असा 'लोकसंवादी' कीर्तनकार आता होणे नाही. महासागरासारखा जनसागर आता उसळणे नाही, हे डॉ. मधुकर वाकोडे यांचे मत विचारात घेतल्यास त्यांच्या कीर्तनशैलीतील तत्वज्ञान स्पष्ट होते. संत गाडगेबाबांनी कीर्तनाच्या माध्यमातून संवाद कौशल्याच्या आधारावर प्रबोधन केले. त्यामुळे संत गाडगेबाबा हे लौकिक निरक्षर असूनही अलौकिकरित्या अक्षरज्ञानी होते.

**निष्कर्ष :-**

१) मौखिक परंपरेतील जनसंवादाचे एक प्रभावी माध्यम म्हणून कीर्तनाला महत्त्वाचे स्थान आहे.

२) कीर्तनामध्ये गायन, वादन, वक्तृत्व, अभिनय, विनोद, गांभीर्य आणि श्रोतृसंवाद या विशेषांचा संयोग आढळून येतो.

३) नवविध भक्तीमध्ये कीर्तनाचा महिमा प्राचीन काळापासून वर्णन केला गेला आहे.

४) महाराष्ट्राला वैदिक काळापासून कीर्तनाची महान परंपरा लाभलेली आहे.

५) संत गाडगेबाबा यांनी लोकशिक्षणाच्या व्यापक हेतूने पारंपारिक कीर्तनसंस्थेला फाटा देऊन स्वत:ची लोकसंवादी किंवा श्रोतृसंवाद कीर्तन परंपरा निर्माण केली.

६) संत गाडगेबाबा यांनी आपल्या कीर्तनातून अंधश्रद्धा, कर्मकांड, देववाद, भोळसट आणि दृष्ट प्रवृत्तींविषयी तत्वज्ञान सांगीतले.

७) बहुजनांच्या कल्याणासाठी संत गाडगेबाबांनी स्वत:च विकसित केलेली कीर्तनशैली म्हणजे ‘एकपात्री नाट्यप्रयोग’ होता.

८) संत गाडगेबाबा हे उत्तम लोकसंवादक होते, हे त्यांच्या अखेरच्या कीर्तनातून अधिक स्पष्ट होते.

९) देवाधर्माचे अवास्तव स्तोम त्यांनी कीर्तनातून न मांडता लोकभाषेतून कीर्तनाला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

१०) लोकसंवादी कीर्तनशैलीचा स्वीकार करून त्यांनी जनसंवाद साधला.

११) संत गाडगेबाबांच्या कीर्तनातील विषय हे तर्कशुद्ध आणि बुद्धीनिष्ठ असल्यामुळे तसेच हे विषय जनतेच्या भावनांशी संबंधित असल्याने प्रामुख्याने त्यांच्या कीर्तनातून जनसंवाद प्रक्रीया यशस्वी आणि प्रभावी होण्यास सहाय्यभूत ठरली.

**संदर्भ** :-

१) डॉ. मांडे प्रभाकर - लोकरंगभूमी – परंपरा, स्वरूप आणि भवितव्य, मधुराज पब्लिकेशन, पुणे.

२) दाते, य. रा. कर्वे, चिं. ग. महाराष्ट्र शब्दकोष - विभाग दुसरा

३) डॉ. पाठक यशवंत - नाचू कीर्तनाचे रंगी

४) प्रबोधनकार ठाकरे - श्री गाडगेबाबा

५) डॉ. वाकोडे मधूकर- निष्काम कर्मयोगी : संत गाडगेबाबा